P CRA

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
कृषि विभाग
नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प
३० अर्केड, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई ४०० ००५

दूरध्वनी क्र. - ०२२-२२१६३३५१ ई-मेल - mahapocra@gmail.com

जा.क्र. :- नादेकृसंप्र-१२२०/प्र.क्र.१८०/कृव्यवि/मा.सु./ ७४ /२०१९-२० दिनांक: २२ /०१ /२०२१

प्रति,

१. प्रकल्प संचालक, आत्मा (प्रकल्पातील सर्व १५ जिल्हे)

२. उपविभागीय कृषी अधिकारी (प्रकल्पांतर्गत ३६ उपविभाग)

विषय - **"वित्तीय संस्था/व्यावसायिक बँका यांनी मूल्यांकन केलेल्या व्यावसायिक प्रस्तावांना सहाय्य करणे (शेतकरी गट/शेतकरी उत्पादक संघ /शेतकरी उत्पादक कंपनी)" तसेच "भाडे तत्त्वावर कृषि अवजारे सेवा केंद्रांची निर्मिती करणे" या घटकांसाठीच्या मार्गदर्शक सुचनेमधील सुधारणांबाबत.**

संदर्भ : १. या कार्यालयाकडील पत्र क्र. नादेकृसंप्र-१११८/प्र.क्र. १६३/कृव्यवि/४६०, दि. १३.११.२०१८
२. या कार्यालयाकडील पत्र क्र. नादेकृसंप्र-१११८/प्र.क्र. १६८/कृव्यवि/५२४, दि. ०७.१२.२०१८
३. या कार्यालयाकडील भाडेतत्वाचा करारनामा शुद्धिपत्रक पत्र क्र. नादेकृसंप्र-१११८/प्र.क्र. १६३ /कृव्यवि/४२, दि. १५.०१.२०१९
४. या कार्यालयाकडील भाडेतत्वाचा करारनामा शुद्धिपत्रक पत्र क्र. नादेकृसंप्र-१११८/प्र.क्र. १६८ /कृव्यवि/४१, दि. १५.०१.२०१९
५. या कार्यालयाकडील पत्र क्र. नादेकृसंप्र-०५१९/प्र.क्र. ८३ /DBT/६४५, दि. १८.०९.२०१९
६. या कार्यालयाकडील पत्र क्र.नादेकृसंप्र-०५१९/प्र.क्र.९२/कृव्यवि/७७४/२०१९, दि.२४.१०.२०२०
७. या कार्यालयाकडील पत्र क्र. नादेकृसंप्र-१११८/प्र.क्र. १६३/कृव्यवि/२६४, दि. ०५.०३.२०२०
८. या कार्यालयाकडील पत्र क्र. नादेकृसंप्र-१११८/प्र.क्र. १६८/कृव्यवि/३३५, दि. ०८.०५.२०२०
९. या कार्यालयाकडील पत्र क्र. नादेकृसंप्र-०५१९/प्र.क्र. ९२/ कृव्यवि/६९८, दि. १२.११.२०२०

उपरोक्त संदर्भ क्र. १ व २ अन्वये, वित्तीय संस्था/व्यावसायिक बँका यांनी मूल्यांकन केलेल्या व्यावसायिक प्रस्तावांना सहाय्य करणे (शेतकरी गट/शेतकरी उत्पादक संघ /शेतकरी उत्पादक कंपनी) तसेच भाडे तत्त्वावर कृषि अवजारे सेवा केंद्रांची निर्मिती करणे या घटकांसाठीच्या मार्गदर्शक सूचना सन २०१८-१९ नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पांतर्गत निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. सदर मार्गदर्शक सूचनांमध्ये संदर्भ क्र. ३ ते ९ अन्वये वेळोवेळी बदल/ सुधारणा करण्यात आलेल्या आहेत. तथापि क्षेत्रीय स्तरावरील कर्मचारी /अधिकारी यांचेकडून प्राप्त होत असलेल्या अभिप्रायानुसार **सदर मार्गदर्शक सूचनांमध्ये पुढील प्रमाणे अधिकच्या सुधारणा/ बदल करण्यात येत आहेत. उर्वरित मार्गदर्शक सूचना आधीप्रमाणे कायम राहतील.**

| अ.क्र. | यापूर्वीच्या सूचना | सुधारणा/ बदल |
|---|---|---|
| **अ.** | **शेतकरी उत्पादक कंपनी/शेतकरी गट यांच्या पात्रतेचे निकष:** | |
| १. | प्रकल्पांतर्गत जिल्ह्यातील शेतकरी उत्पादक कंपन्या/शेतकरी उत्पादक संघ. | प्रकल्पांतर्गत जिल्ह्यातील किमान १०० सभासद नोंदणीकृत असलेल्या शेतकरी उत्पादक कंपन्या सदर घटकांतर्गत लाभ घेण्यासाठी पात्र राहतील. |
| २. | प्रकल्पासाठी निवड झालेल्या गावातील कोणत्याही यंत्रणेकडे नोंदणी झालेले शेतकरी/ महिला/ भूमिहीन व्यक्तींचे इच्छुक गट. | प्रकल्पासाठी निवड झालेल्या गावातील कोणत्याही यंत्रणेकडे (उदा. आत्मा, माविम, MSRLM इ.) नोंदणी झालेले शेतकरी/ महिला/ भूमिहीन व्यक्तींचे इच्छुक/ पात्र गटामध्ये प्रधानमंत्री किसान योजनेसाठी पात्र कुटुंबाच्या धर्तीवर आधारित कुटुंबाची व्याख्या विचारात घेऊन वेगवेगळ्या कुटुंबातील किमान ११ सदस्य असणे आवश्यक आहे. |
| ३. | शेतकरी उत्पादक कंपनी/ शेतकरी गट यांच्या प्रकल्पास नोंदणीकृत बँक/ वित्तीय संस्था यांचेकडून कर्ज मंजूर होणे आवश्यक आहे. (कर्जाची रक्कम ही मंजूर अनुदानाच्या किमान दीडपट असणे आवश्यक आहे.) | प्रकल्प मूल्य रु. २०.०० लक्ष पेक्षा जास्त असलेल्या शेतकरी उत्पादक कंपनी/ शेतकरी गटाच्या प्रकल्पास नोंदणीकृत बँक/ वित्तीय संस्था यांचेकडून कर्ज मंजूर होणे बंधनकारक आहे. सदर कर्जाची रक्कम ही मंजूर अनुदानाच्या किमान सव्वापट (१.२५ वेळा) असणे आवश्यक आहे. उदा. रु. ४०.०० लाखाचा प्रस्ताव असल्यास रु. २४.०० लाख अनुदान प्राप्त होईल व त्यासाठी किमान रु. ३०.०० लाख कर्ज व रु. १०.०० लाख स्वनिधी आवश्यक राहील. |
| ४. | - | रु. २०.०० लाखाच्या आतील प्रस्तावामध्ये स्वनिधी गटाच्या/ कंपनीच्या बँक खात्यात उपलब्ध आहे/ सभासदांकडून उभारण्यात येणार आहे याची खात्री करावी. प्रकल्पांतर्गत अर्थसहाय्य देताना गटाच्या/कंपनीच्या बँक खात्यातून प्रकल्पासाठी खर्च झालेली रक्कमच अनुदान अदायगीसाठी ग्राह्य धरण्यात येईल. |
| **ब.** | **तपशीलवार सविस्तर प्रकल्प अहवाल आणि इतर दस्तऐवज:** | |
| १. | पात्र शेतकरी उत्पादक कंपनी/ नोंदणीकृत शेतकरी गटांनी घटकांतर्गत बाबींचा लाभ घेण्यासाठी आवश्यक कागदपत्रांसह विहित नमुन्यात अर्ज, हमीपत्र व प्रकल्प अहवाल उपविभागीय कृषि अधिकारी यांचेकडे सादर करावा. | पात्र शेतकरी उत्पादक कंपनी/ नोंदणीकृत शेतकरी गटांनी घटकांतर्गत बाबींचा लाभ घेण्यासाठी आवश्यक कागदपत्रांसह विहित नमुन्यात अर्ज, हमीपत्र व प्रकल्प अहवाल उपविभागीय कृषि अधिकारी यांचेकडे सादर करावा. |

| | | |
|---|---|---|
| | | यामधील प्रत्येक पृष्ठावर तसेच सोबत जोडलेल्या कागदपत्रांवर संबधित गट/ कंपनी यांचे सचिव/ अध्यक्ष यांची स्वाक्षरी असावी. |
| २. | - | सविस्तर प्रकल्प अहवालामध्ये शेतकरी उत्पादक कंपनी असल्यास, RoC यांनी निर्गमित केलेली तसेच संचालक/ सचिव यांनी प्रमाणित केलेली परिपूर्ण भागधारक/ सभासद शेतकरी यादी आवश्यक आहे. |
| ३. | - | शेतकरी उत्पादक कंपनी/ स्वयंसहायता गटांना इतर कोणत्याही निधी स्त्रोताकडून किंवा इतर योजनेतून **प्रस्तावित प्रकल्पासाठी** अनुदान प्राप्त नाही याची खात्री करावी. प्रस्तावित प्रकल्पाव्यतिरिक्त **इतर प्रकल्पासाठी** अनुदान प्राप्त असल्यास त्याची सविस्तर माहिती सविस्तर प्रकल्प अहवालामध्ये (DPR) देणे आवश्यक राहील. |
| ४. | DPR- तपशीलवार प्रकल्प अहवाल | तपशीलवार सविस्तर प्रकल्प अहवाल (Detail Project Report-DPR) सादर करणे आवश्यक आहे. रु. २०.०० लक्ष पेक्षा अधिक प्रकल्प मूल्य असल्यास सदर तपशीलवार प्रकल्प अहवाल हा सनदी लेखापाल/ शासकीय संस्था/ MITCON/ CFTRI/ MCDC/ कृषि विद्यापीठ/ Chamber of Commerce/ कृषी व्यवसाय निगडीत तत्सम संस्था यांनी प्रमाणित केलेला असावा. यामध्ये प्रकल्पाचे तंत्र-आर्थिक यथायोग्यता (Techno-economic feasibility), गृहितके, तंत्रज्ञान, कुशल मनुष्यबळ इ. बाबत विश्लेषण आवश्यक आहे. |
| ५. | - | प्रकल्प मूल्याच्या १ टक्के पर्यंत रक्कम अनुषंगिक खर्च, जसा प्रकल्प अहवाल तयार करणे, बांधकाम आराखडा यांस तांत्रिक मान्यता घेणे, प्रशिक्षण, मुल्यांकन खर्च, विमा खर्च, RTO charges, प्रापण प्रक्रिया खर्च इ. प्रकल्पासाठी झालेला अनुषंगिक खर्च प्रकल्प मूल्यामध्ये घेता येईल. अनुदानाची परिगणना करताना प्रत्यक्ष झालेला अनुज्ञेय अनुषंगिक खर्च किंवा प्रकल्प मूल्याच्या १ टक्के यापैकी जे कमी असेल त्याचा अंतर्भाव करून एकूण खर्चाच्या ६०% अनुदानाची परिगणना करावी. |

| | | |
|---|---|---|
| ६. | वार्षिक अहवाल आणि मागील तीन वर्षाचे ऑडीटेड स्टेटमेंट (असल्यास). | प्रकल्प मूल्य रु. २०.०० लक्ष पेक्षा अधिक असल्यास सदर गट अथवा कंपनीने मागील किमान एक वर्षाचा लेखापरीक्षण अहवाल सादर करणे अनिवार्य आहे. |
| ७. | - | गोदाम तसेच बिजोत्पादन केंद्र उभारणी सारख्या बांधकाम प्रकल्पांच्या आराखड्यास वखार महामंडळ/ सार्वजनिक बांधकाम विभाग (PWD)/ जिल्हा परिषद/ कृषी विद्यापीठ/ शासकीय संस्था यांची तांत्रिक मंजुरी प्राप्त करून घेणे आवश्यक आहे. |
| ८. | प्रकल्पासाठी उपलब्ध जमिनीचा ७/१२, ८-अ किंवा २० वर्षे भाडेतत्वाचा नोंदणीकृत करारनामा तसेच आवश्यक असल्यास प्रकल्पाच्या वापरासाठी परवानगी असलेबाबत सक्षम अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र) | प्रकल्पासाठी उपलब्ध जमिनीचा गटाच्या /कंपनीच्या नावावर असलेला ७/१२, ८-अ किंवा २० वर्षे भाडेतत्वाचा नोंदणीकृत करारनामा तसेच आवश्यक असल्यास प्रकल्पाच्या वापरासाठी परवानगी असलेबाबत सक्षम अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. मात्र प्रकल्प मूल्य रु. २०.०० लक्ष पेक्षा कमी असल्यास तसेच प्रकल्पांतर्गत "बांधकाम" ही बाब प्रमुख नसल्यास किमान ७ वर्षाचा नोंदणीकृत भाडेतत्वाचा करारनामा सादर करणे आवश्यक आहे. |
| ९. | - | प्रकल्पासाठी अनुदान अदायगी झाल्यानंतर सदर प्रकल्प किमान पाच वर्षे कार्यान्वित ठेवणे विषयक हमीपत्र देणे आवश्यक आहे. |
| १०. | - | बँक/ वित्तीय संस्थेबरोबर करावयाच्या त्रिपक्षीय करारनामा (Agreement) मध्ये, मुद्दा क्र. ३.३ मधील Responsibilities of FPC/FPO/FIG/SHG अंतर्गत " The FPC/FPO/FIG/SHG will not sell/transfer the project assets completely or in part and shall run the project for at least five years after disbursal of grants." मुद्दयाचा अंतर्भाव करावा. |
| **क.** | **पूर्वसंमती, मोका तपासणी आणि अनुदान अदायगी पश्चात करावयाची कार्यवाही:** | |
| १. | - | उपविभागीय कृषी अधिकारी स्तरावर पूर्वसंमती दिलेल्या प्रस्तावांना, प्रकल्प उभारणी व अनुदान अदायगी पश्चात प्रकल्पास वेळोवेळी भेट देऊन मार्गदर्शन करावे. प्रकल्प कार्यान्वित असल्याबाबतचा अहवाल उपविभागीय कृषी अधिकारी यांनी सादर करावा. |
| २. | - | प्रकल्प संचालक, आत्मा स्तरावर पुर्वसंमती दिलेल्या प्रस्तावांना प्रकल्प उभारणी तथा अनुदान अदायगी पश्चात जिल्ह्यातील सर्व प्रकल्पांस |

| | | |
|---|---|---|
| | | वेळोवेळी भेट देऊन मार्गदर्शन करावे. प्रकल्प कार्यान्वित असलेबाबतचा अहवाल प्रकल्प संचालक, आत्मा यांनी सादर करावा. |
| ३. | **प्रकल्प स्तरावरील प्रस्ताव (कृषि व्यवसाय विशेषज्ञ (प्रकल्प स्तर) अथवा त्यांचे प्रतिनिधी):-**<br>उपविभागीय कृषी अधिकारी यांची शिफारस विचारात घेऊन अर्जदार संस्था व नियोजित प्रकल्प स्थळास भेट दे-ऊन नियोजित प्रकल्प स्थळ प्रस्तावित प्रकल्पासाठी योग्य असल्याची खात्री करावी. उभारणी पूर्व मोका तपासणीचे लाभार्थी संस्थेचे प्रमुखासह अक्षांश व रेखांश सह छायाचित्र काढून संगणक प्रणालीवर अपलोड करावेत.<br>उपविभागीय कृषि अधिकारी यांचेकडून प्राप्त संभाव्य अनुदान रक्कम रु. २५.०० लक्ष ते ५०.०० लक्ष पर्यंत अनुदान रकमेचे असलेल्या प्रकल्पांना पूर्वसंमती व अनुदान अदायगीची कार्यवाही करावयाची आहे.<br>पूर्वसंमती दिलेल्या प्रकल्पांना उभारणीपूर्व, उभारणी दरम्यान व उभारणीपश्चात भेटी द्याव्यात.<br>प्रकल्प पूर्ण झाल्याचे लाभार्थी संस्थेने अवगत केल्यानंतर नोंदणीकृत बँक/ वित्तीय संस्थांचे प्रतिनिधी व लाभार्थी संस्थेचे प्रमुख यांच्या समवेत उभारणी पश्चात प्रकल्पास भेट देऊन विहित नमुन्यातील मोका तपासणी पूर्ण करावी. प्रकल्पासमवेत लाभार्थी संस्थेचे प्रमुख, नोंदणीकृत बँक/ वित्तीय संस्थेचे प्रतिनिधी यांचेसह तपासणीचे छायाचित्र अक्षांश व रेखांश सह प्रकल्पाच्या संकेत स्थळावर अपलोड करावेत. | **प्रकल्प व्यवस्थापन कक्षाकडे सादर करावयाचे प्रस्ताव:**<br>प्रकल्प स्तरावर पूर्व मंजुरी करिता प्रस्ताव पाठवताना, प्रकल्प संचालक, आत्मा यांनी उपविभागीय कृषी अधिकारी यांची शिफारस विचारात घेऊन व प्रकल्पाच्या नियोजित ठिकाणास स्थळ पाहणी समितीने सदस्यांसह भेट देऊन नियोजित जागा प्रस्तावित प्रकल्पासाठी योग्य असल्याची खात्री करावी. उभारणी पूर्व मोका तपासणीचे लाभार्थी संस्थेच्या प्रमुखासह अक्षांश व रेखांश सह छायाचित्र काढावे. तसेच प्रकल्प स्तरावरून पूर्वसंमती दिलेल्या प्रकल्पांना उभारणीपूर्व, उभारणी दरम्यान व उभारणी पश्चात प्रकल्प संचालक, आत्मा यांनी भेटी द्याव्यात. या वेळेस अर्जदार संस्थेचे (FPO/FPC/शेतकरी गट इ.) सभासद उपस्थित राहण्याबाबत संस्थेस सूचना करावी व भेटी दरम्यान सभासदांना प्रकल्पाबाबत अवगत करावे.<br>प्रकल्प व्यवस्थापन कक्षाकडे प्राप्त संभाव्य अनुदान रक्कम रु. २५.०० लक्ष ते ६०.०० लक्ष पर्यंत अनुदान रकमेचे असलेल्या प्रकल्पांना पूर्वसंमती व अनुदान अदायगीची कार्यवाही प्रकल्प व्यवस्थापन कक्षामार्फत करावयाची आहे.<br>प्रकल्प व्यवस्थापन कक्षाकडून पूर्वसंमती दिलेल्या प्रस्तावांना, प्रकल्प पूर्ण झाल्याचे लाभार्थी संस्थेने अवगत केल्यानंतर नोंदणीकृत बँक/ वित्तीय संस्थांचे प्रतिनिधी व लाभार्थी संस्थेचे प्रमुख यांच्या समवेत प्रकल्प स्तराचे प्रतिनिधी म्हणून संबंधित **प्रकल्प संचालक, आत्मा** यांनी उभारणी पश्चात प्रकल्पास भेट देऊन विहित नमुन्यातील संयुक्त मोका तपासणी पूर्ण करावी. प्रकल्पासमवेत लाभार्थी संस्थेचे प्रमुख, नोंदणीकृत बँक/ वित्तीय संस्थेचे प्रतिनिधी यांचेसह तपासणीचे अक्षांश व रेखांश सह छायाचित्र काढावे आणि अनुदान अदायगीची शिफारस प्रकल्प व्यवस्थापन कक्षाकडे करावी. |

| | | |
|---|---|---|
| ४. | - | अनुदान अदायगी पश्चात संबंधित FPC/FPO/ शेतकरी गट यांनी प्रकल्पाच्या प्रगतीबाबतचा अहवाल वेळोवेळी उपविभागीय कृषि अधिकारी कार्यालयास सादर करावा. |
| ड. | **प्रकल्प उभारणी संदर्भात प्रापण विषयक बाबी:** | |
| १. | - | मंजूर घटकांतर्गत बांधकाम, यंत्रसामुग्री, वस्तू इ. ची खरेदी प्रकल्पाच्या प्रापण (Procurement Manual) व प्रकल्पाने या संबधी निर्गमित केलेल्या प्रापण विषयक मार्गदर्शक सूचनांच्या अनुषंगाने पारदर्शकपणे करणे बंधनकारक राहील. |
| २. | - | प्रस्तावाचे प्रकल्प मूल्य रु. २०.०० लक्ष पेक्षा जास्त असल्यास, प्रकल्पाचे मुल्यांकन (Valuation) करण्याकरिता नोंदणीकृत मुल्यांकनकर्ता (Registered Valuers) यांनी दिलेला अहवाल प्रकल्प उभारणी पूर्ण झालेनंतर शेतकरी उत्पादक कंपनी/ शेतकरी उत्पादक गटाने अनुदान मागणी पत्रासोबत जोडलेला असावा. |

उपरोक्त प्रमाणे प्रकल्पांतर्गत मंजूर प्रकल्पांची उभारणी मार्गदर्शक सूचना आणि प्रापण प्रक्रियेचा अवलंब करून विहित कालावधीत पूर्ण होईल याबाबत आवश्यक ते संनियंत्रण करावे.

**(विकास चंद्र रस्तोगी)**
**प्रकल्प संचालक**

**प्रत - माहितीस्तव**

१. सचिव (कृषी), कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.

**माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव अग्रेषित**

२. आयुक्त (कृषी), कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१.
३. विभागीय कृषी सह संचालक (नागपूर, नाशिक, लातूर, औरंगाबाद व अमरावती)
४. जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी (प्रकल्पातील समाविष्ट सर्व १५ जिल्हे)